सत्यमेव जयते

अन्न बहु कुर्वीत तद् व्रतम्

**महाराष्ट्र शासन**

**महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी**

कार्यालय- नियंत्रक, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी.

दुरध्वनी क्र. ०२४२६-२४३२२६
ई-मेल comptmpkv@gmail.com
ac2mpkv@gmail.com

पत्ता :- मध्यवर्ती परिसर, प्रशासकीय इमारत,
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी,
ता. राहुरी, जि. अहमदनगर. पिन- ४१३ ७२२.

जा.क्र.मफुकृवि/लेखा-२/वि.का.न.मं/२८३/२०२३, दि.:-२३/०६/२०२३.

## परिपत्रक

**विषय :-** विविध कार्यपुर्तीस्तव नस्ती मंजुरीस सादर करणेबाबत . . .
**संदर्भ :-** शासन निर्णय क्र. भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-II/उद्योग-४, दि. १/१२/२०१६.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये कळविण्यात येते की, विविध कार्यालयाकडुन कार्यपूर्तीस्तव नस्ती मा. कुलगुरु महोदय यांच्या मंजुरीस सादर करण्यात येतात. त्यामध्ये एकच कामांच्या नस्तीची विभागणी करण्यात येऊन वेगवेगळया नस्ती मंजुरीस सादर करण्यात येतात असे निदर्शनास आले आहे.

त्यानुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णय मधील प्रकरण क्र. ३.२.३ अन्वये खरेदी अधिकारी मोठे आदेश लहान लहान आदेशांमध्ये विभागणी करतात आणि ते त्याच विक्रेत्यांकडून दरपत्रकाच्या माध्यमातून खरेदी करतात. ही प्रथा काटेकोरपणे टाळण्यात यावी असे निर्देशीत केलेले आहे.

तसेच महाविद्यालयांकडून कुलमंत्री, उपकुलमंत्री व वसतिगृह सहाय्यक यांचे मानधन अदा करणेस्तव सादर नस्तीमध्ये मानधन देय अधिकारी/कर्मचारी हे प्रस्तावात नमुद कालावधीत दिर्घ रजेवर नसल्याबाबतचे प्रमाणपत्र जोडलेले नसते. सदर नस्तीमध्ये दिर्घ रजेचा कालावधी वगळून प्रस्ताव मंजुरी सादर होणे अपेक्षित आहे.

(विजय त्र्यं. पाटील)
नियंत्रक,
मफुकृवि, राहुरी.

प्रत माहिती व उचित कार्यवाहीस्तव :-

१. सर्व विभाग/योजना/कार्यालय प्रमुख, मफुकृवि, राहुरी.
२. अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी/पुणे/धुळे/कोल्हापूर.
३. अतिरिक्त अधिदान व लेखा अधिकारी, मफुकृवि, राहुरी.